# रिसोड येथे राजमाता जिजाऊ यांची पुण्यतिथी साजरी

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**रिसोड** - येथील वाशिम नाका स्थानिक परिसरातील भाजप कार्यालयात राजमाता स्वराज्य जननी मॉ जिजाऊ यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



प्रत्येकाच्या मना-मनात जिजाऊ चे विचार असायला पाहिजेत. व त्यांचे कार्य आप-आपल्या प्रथिने सर्वांपर्यंत पोहोचवा. तसे कार्य करण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे असे विचार यांप्रसंगी किसान आघाडीचे बबनराव मोरे यांनी पुण्यतिथी निमित्त व्यक्त केले.याप्रसंगी भाजपचे जिल्हा कार्यकारणी सदस्य नामदेवराव हुंबाड, इकिसान आघाडीचे बबनराव मोरे, भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष मंचकराव जाधव, दिनकराव बोडखे, डॉ. खानझोडे साहेब, शिव फार्माङ संचालक अमोल मोरे, लक्ष्मणराव हुंबाड, हिम्मतराव हुंबाड, सुदामराव ढोले बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# रिसोड पोलिसांची धडाकेबाज कारवाई हिंगोली दरोड्याचे मुख्य आरोपी जेरबंद





▸ महासागर प्रतिनिधी ▸

**रिसोड** - हिंगोली येथे तीन दिवसांपूर्वी घडलेल्या मोठ्या दरोड्याचा पर्दाफाश करत रिसोड पोलिसांनी एक धाडसी कारवाई केली आहे. फ्लिपकार्ट कंपनीच्या मालाने भरलेले वाहन पळवून सुमारे साडेआठ लाखांचा माल चोरी करणाऱ्या टोळीला रिसोड येथे अटक करण्यात आली. या प्रकरणात मुख्य आरोपी ज्ञानेश्वर खांझोडे व परमेश्वर चौधरी यांच्यासह सात संशयितांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून ५ ते ६ लाख रूपयांचा चोरी गेलेला माल जप्त करण्यात आला आहे.

हिंगोली पोलिसांकडून मिळालेल्या गोपनीय माहितीवरून रिसोड पोलिस ठाण्याचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी दोन पथकांची निर्मिती करून सर्च ऑपरेशन सुरू केले. संशयित आरोपी रिसोड परिसरात लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी वेगाने हालचाली करत काही तासांतच आरोपींचा शोध लावला. आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्यांना शिताफीने ताब्यात घेतले.दरोड्याच्या रात्री आरोपींनी फ्लिपकार्ट कंपनीचे मालवाहू वाहन अज्ञात स्थळी नेले आणि त्यातील साडेआठ लाखांचा माल दुसऱ्या वाहनात भरून चोरी केली. पोलिसांनी या गुन्ह्याचा माग काढून गुन्हेगारांपर्यंत पोहोचण्याचे कसब दाखवले. आरोपी अत्यंत धूर्त आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असल्यामुळे त्यांना अटक करणे हे एक आव्हान होते. मात्र, रिसोड पोलिसांच्या नियोजनबद्ध आणि तत्पर कारवाईमुळे हा गुन्हा लवकरच उघडकीस आला.ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे , अपर पोलीस अधीक्षक लता फड मॅडम आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर नागरे, पोलीस हवालदार मालवे, रंजवे, तसेच पोलीस कॉन्स्टेबल सुशील इंगळे, विनोद घनवट, रवी अडागळे, परमेश्वर घोणे, अनिल राठोड, प्रवीण गोपनारायण आणि रवी इरतकर यांनी सहभाग घेतला.

# प्रकल्प अधिकारी गायब? मुख्यमंत्री रोजगार निर्मिती प्रशिक्षणात गंभीर अनियमितता!

## शासनाच्या पैशाचा अपव्यय? प्रशिक्षण केवळ कागदोपत्रीच!

▸ विनोद तायडे ▸

**वाशिम** - मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत (CMEGP) महाराष्ट्र राज्य उद्योजकता विकास केंद्रामार्फत वाशिम येथे सुरू असलेल्या प्रशिक्षण शिबिरात गंभीर आर्थिक अनियमितता आणि प्रशासकीय बेपर्वाई उघडकीस आली आहे. प्रशिक्षण केंद्रावर प्रकल्प अधिकारीच अनुपस्थित असताना प्रशिक्षणाचे आयोजन थातूरमातूर रितीने राबवले जात असल्याचे समोर आले आहे.

MCED

शासनाच्या निधीवर मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असून, प्रशिक्षणार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या जेवण, निवासी सुविधा, तसेच व्याख्यान व्यवस्था यामध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. अनेक प्रशिक्षणार्थींनी याबाबत नाराजी व्यक्त केली असून, प्रशिक्षण फक्त कागदावर दाखवले जात असल्याचा आरोपही केला जात आहे. या संदर्भात आमचे प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठ अधिकारी श्री. बागडे यांच्याशी संपर्क साधला असता, 'निवासी प्रशिक्षणार्थीच नाहीत, म्हणून आम्ही निवासाची व्यवस्था केली नाही,' असे उत्तर मिळाले. परंतु हे उत्तर अधिक प्रश्न निर्माण करणारे ठरत असून प्रशिक्षणाच्या नावाखाली फक्त निधी खर्च करण्यावरच भर असल्याचे यावरून स्पष्ट होते.विशेष म्हणजे, काही खासगी संस्थांच्या नावाने खोट्या बिलांची उचल होत असल्याची चर्चा सुरू असून, संपूर्ण व्यवस्थेत पारदर्शकतेचा अभाव दिसून येतो. आधीही वाशिम येथील उद्योजकता केंद्रावर अनेक तक्रारी झाल्या असूनही, त्यावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने 'हम नहीं सुधरेंगे' हीच कार्यशैली अधिकाऱ्यांनी स्वीकारल्याचे चित्र आहे.या साऱ्या प्रकारांमुळे नवउद्योजकांचा सरकारवरचा विश्वास ढासळत असून, शासनाच्या रोजगार निर्मिती धोरणालाच गालबोट लागत आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने चौकशी करून कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### प्रकल्प अधिकारी गायब - जबाबदारी कुणाची?

शासनाने कोट्यवधींच्या योजनां साठी निधी मंजूर करूनही, प्रशिक्षण केंद्रावर प्रकल्प अधिकारी स्वतः गायब आहेत. प्रशिक्षणार्थींच्या समस्या, व्यवस्थापनातील त्रुटी आणि प्रशिक्षणाच्या दर्जाबाबत कोणीही जबाबदारी घेण्यास तयार नाही. हा प्रशासकीय गलथान पणा की मुद्दाम केलेली दुर्लक्ष? असा प्रश्न उपस्थित होतो.

### निवासी प्रशिक्षण, पण निवासी कुठे?

तोंडी आणि कागदी प्रशिक्षणात मोठा फरक आहे. प्रशिक्षणार्थींना दिल्या जाणाऱ्या निवासी सुविधा, जेवण, व गुणवत्तायुक्त मार्गदर्शनाचा पुरता अभाव आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारणा केली असता 'निवासी प्रशिक्षणार्थीच नाहीत, म्हणून निवासाची गरज नव्हती' असे सांगण्यात आले. हा खुलासा दिशाभूल करणारा असून खऱ्या परिस्थितीवर पडदा टाकण्याचा प्रयत्न दिसतो.

### बिलाच्या नावाने 'खेळ' सुरूच!

संबंधित कार्यक्रमांत विविध संस्थांच्या नावाने बिल काढले जात असून त्यामागे कोणत्या हातांची चाल आहे हे तपासाचे विषय बनू शकते. शासनाच्या निधीवर डल्ला मारण्याचा प्रकार घडत असल्याची जोरदार चर्चा आहे.

### 'हम नहीं सुधरेंगे' वृत्ती कायम!

वाशिम येथील उद्योजकता विकास केंद्राच्या अधिकारी वर्गावर आधीपासूनच अनेक तक्रारी आहेत. मात्र, या तक्रारींवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची 'हम नहीं सुधरेंगे' वृत्ती आणखीनच बळावली आहे. त्यामुळे संपूर्ण यंत्रणा अपयशी ठरत असून नवउद्योजकांचा विश्वास ढासळत चालला आहे.

### शासनाच्या पैशाचा अपव्यय थांबवा!

या प्रशिक्षणामध्ये जे काही चालले आहे ते निव्वळ 'पैशाच्या उधळपट्टीचे ठसठशीत उदाहरण' आहे.

फक्त निधी वापरून कागदोपत्री प्रशिक्षण दाखवणे म्हणजे शासकीय योजनेचा अपमानच म्हणावा लागेल. जनतेमध्ये संतापाची लाट असून संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ लक्ष घालून चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, हीच सर्व सामान्यांची मागणी आहे.

# सवड गावाजवळ दुचाकी अपघात,जीवितहानी टळली

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**रिसोड** - दि. १६ जून रोजी रात्री ८.३० वाजता, रिठद येथील लग्नकार्य आटोपून परत येत असलेल्या कुटुंबीयांच्या दुचाकी आणि समोरून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीचा सवड गावाजवळील धान्य गोडाऊन जवळ भीषण समोरासमोर अपघात झाला. या अपघातात भरजहागीर येथील कैलास चवरे हे त्यांच्या कुटुंबासह जखमी झाले असून, दुसऱ्या दुचाकीवर हराळ गावातील एक गृहस्थ प्रवास करत होते.



अपघात इतका जोरदार होता की दोन्ही दुचाकींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, दोन्ही वाहनस्वारांना गंभीर मार लागला आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र उपस्थित लोकांनी सांगितल्याप्रमाणे जखमींना गंभीर दुखापती झाल्या आहेत. घटनास्थळी नेमक्या वेळी रिसोड येथील प्रसिद्ध डॉक्टर डॉ. तिवारी उपस्थित असल्याने तात्काळ जखमींवर प्रथमोपचार करण्यात आला. डॉ. तिवारी यांनी प्रसंगावधान राखून तत्काळ ॲम्बुलन्स उपलब्ध करून दिली आणि जखमींना वैद्यकीय उपचारासाठी हलविण्यात आले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी त्यांना ' देवदूतासारखा' संबोधले.कैलास चवरे हे सध्या रिसोड शहराजवळील सनराईज शाळेमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत असून,

त्यांच्या समवेत असलेले इतर कुटुंबीय सुदैवाने फारशी जखमी झाले नाहीत.या अपघातामुळे परिसरात काही वेळ वाहतुकीची कोंडी झाली होती. स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी पुढाकार घेत रस्ता मोकळा केला. अपघाताचे नेमके कारण अस्पष्ट असले तरी वेग आणि रस्त्यावरील अपुरे दिवे यामुळेच हा अपघात झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

या घटनेने पुन्हा एकदा ग्रामीण भागातील रस्ते सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संबंधित विभागाने अपघात प्रवण भागात योग्य प्रकाशयोजना व सावधानता फलक लावण्याची आवश्यकता आहे.

# नाल्याचे खोलीकरण चुकीच्या पद्धतीने शेतकऱ्याचा आरोप?

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**रिसोड** - रिसोड करडा मार्गावरील नाल्याचे खोलीकरण चुकीच्या पद्धतीने केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. पावसाळ्यात पुराची परिस्थिती निर्माण होऊन आसपासच्या शेतजमिनी मध्ये पाणी शिरते. परंतु अद्यापही ठोस कारवाई झालेली नाही. शेतकऱ्यांनी दिनांक १३ जून रोजी तहसीलदारांना निवेदनद्वारे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास कुटुंबासह तहसील कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशाराही निवेदनातून दिला आहे. रिसोड भाग क्रमांक २ मधील दौलतराव भगवानराव वाकळे. गोपाल पांडुरंग तिखे. गणेश रामचंद्र चोपडे या शेतकऱ्यांनी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना दिनांक १३ जून रोजी निवेदन सादर केले. निवेदनानुसार शेतालगत रिसोड ते करडा मार्गावरील नाल्याचे खोलीकरण चुकीच्या पद्धतीने करण्यात आले आहे. त्यामुळे दरवर्षी नाल्याला पूर आला की पाणी थेट शेतामध्ये शिरते. परिणामी.शेताकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. हे नुकसान वर्षापासून सहन करावे लागत असून नाल्याचे योग्य खोलीकरण किंवा दिशा बदलण्याचे काम न झाल्यास हे संकट कायम राहणार आहे.

यामुळे तात्काळ नाल्याचे खोलीकरण आणि सुधारणा न केल्यास पत्नी व मुलासह संपूर्ण कुटुंबास तहसील कार्यालयासमोर आत्मदहन करावे लागेल. असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे. या निवेदनावर दौलतराव वाकळे. शेख शहाणाज ख मुजफ मुमुद्दीन, गोपाल विखे,राजू इरतकर, राजीव ढगे,शोभा इरतकर, शेख सलीम शेख जावेद, गोविंदा गांजरे,विलास इरतकर, गोपाल चोपडे यांच्यासह स्थानिकाची स्वाक्षरी आहे.

# एमएच-सीइटी मध्ये निसर्ग जाधवची चमकदार कामगिरी

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मानोरा** - राज्य सामायिक परीक्षा कक्षाकडून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात आलेल्या विविध पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहे.

त्यात तालुका निवासी निसर्ग नामा जाधव यानी महाराष्ट्र शासनाकडुन घेण्यात येणाऱ्या अभियांत्रिकी च्या एमएच सीइटी परीक्षेत पीसीएम शाखेत ९३.२३५०८रसेंटाइल घेत आपले चिखली गाव व मानोरा तालुकयाचे नाव रोशन केले आहे.

निसर्ग जाधव हे अखिल भारतीय तांडा सुधार समितीचे महासचिव,



पोरियातारा टीचर्स एंड प्रोफेसर असोसिएशनचे राष्ट्रीय सचिव नामा बंजारा आणि शिक्षिका जयश्री नामा जाधव यांचे चिरंजीव आहेत. निसर्ग जाधव यानी जेईई मुख्य ( JEE Mains) मध्ये सुद्धा ९४.०३ परसेंटाइल गुण मिळविले आहे. व्ही आय टी ट्रिपल इ चेन्नई मध्ये त्याचा प्रवेश निश्चित होता मात्र आई वडिलाच्या आग्रहाखातर त्यांने चेन्नई येथे प्रवेश घेतला नाही. निसर्ग जाधव याचे अजुन आय आय एस इ आर व नायझेर (NIZER) चे निकाल येणे बाकी आहे. निसर्ग जाधव हे कदाचित ९९ पेक्षा अधिक परसेंटाइल घेणारा बंजारा समाजाचा पहिला विद्यार्थी असावा. त्याने आपल्या कुटुंबा सोबतच जिल्ह्याच्या व बंजारा समाजाच्या प्रतीस्ठेत मानाचा तुरा रोवला आहे. निसर्गाच्या या यशाबद्दल मित्र मंडळी व समाज बाँधवानी त्याचे भरभरुन कौतुक केले आहे.

# पर्यवेक्षक अधिकारी गोपाल खाडे यांचा दिल्लीत सन्मान

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**कारंजा लाड** - पी. एम. श्री. जिल्हा परिषद विद्यालय कामरगाव येथे कार्यरत शिक्षक आणि मतदान केंद्रस्तरीय पर्यवेक्षक अधिकारी गोपाल खाडे यांचा राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण संपन्न केल्याबद्दल नवी दिल्लीतील भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था येथे सन्मान करण्यात आला.

भारत निवडणूक आयोगाच्या वतीने १२ व १३ जून रोजी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि ओडिशा या राज्यांतील निवडणूक अधिकाऱ्यांसाठी नवी दिल्लीत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.यात जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी,तहसीलदार, नायब तहसीलदार, पर्यवेक्षक आणि बीएलओ अधिकारी सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून एकूण १३२ अधिकारी या प्रशिक्षणात उपस्थित होते. या प्रशिक्षणात वाशिम जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस., रिसोडच्या उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, ३५ कारंजा मानोरा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधि गोपाल खाडे,वाशिम विधानसभा मतदारसंघाचे सुभाष जवंजाळ व रिसोड मतदारसंघाचे प्रतिनिधी शेख इरफान शेख मुसा हे सहभागी झाले होते .

गोपाल खाडे यांनी बीएलओ ॲप अधिक सुलभ व प्रभावी करण्याबाबत केंद्रस्तरीय मतदान



अधिकारी व केंद्रस्तरीय मतदान पर्यवेक्षक अधिकारी यांच्यात समन्वय राहण्याकरिता पर्यवेक्षकांना सुद्धा आपल्या केंद्रांतर्गत बीएलओ यांचे ॲप पाहता यावे अशी योजना असावी अशी विनंती आपल्या मनोगता तून व्यक्त केली केली. सध्या बीएलओ ॲप मध्ये पर्यवेक्षकांना हे ॲप पाहता येत नसल्याने बी.एल.ओं ना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करताना पर्यवेक्षक अधिकाऱ्यांना अडचणी येतात. राष्ट्रीय स्तरावर या सूचनेची नोंद घेण्यात आली. तसेच यावेळी बीएलओ आणि पर्यवेक्षक यांचे गट करून त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे फॉर्म भरण्यासंदर्भात भूमिका अभिनय सादर करावयाला सांगितला होता.यात गोपाल खाडे यांनी मतदाराची भूमिका सादर करून मनोरंजक पद्धतीने सर्व गटांनी फॉर्म कसे भरावे व त्यासाठी कोणकोणते कागदपत्रे लागतात येथे सादरीकरण केले. या प्रशिक्षण कार्यक्रमात मूर्तिजापूरचे उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार व मनोज लोणारकर मास्टर ट्रेनरनी उपस्थित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विवेक जोशी, निवडणूक आयुक्त, भारत निवडणूक आयोग हे उपस्थित होते. यावेळी गोपाल खाडे यांनी त्यांच्या नावाचे सुलेखन करून भेट दिले.या सुलेखनाबद्दल डॉ. विवेक जोशी यांनी गोपाल खाडे यांचे कौतुक व अभिनंदन केले.गोपाल खाडे यांनी आपल्या यशाचे श्रेय जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस, उपविभागीय अधिकारी कैलास देवरे व तहसीलदार कुणाल झाल्टे, जिल्हा समन्वय अधिकारी सतीश काळे व शाळेचे मुख्याध्यापक प्रा. सुरेश राठोड यांना दिले.

# कारखेडा गावात आदर्श ग्रामपंचायतीची पोलखोल ?

▸ प्रदीप देशमुख ▸

**मानोरा** - पुरस्कार प्राप्त आणि स्वघोषित आदर्श ग्रामपंचायत म्हणून गौरव मिळवलेले कारखेडा हे गाव सध्या ग्रामस्थांच्या संतापाचा केंद्रबिंदू ठरले आहे. यंदाच्या पहिल्याच पावसात गावातील मुख्य वार्ड क्रमांक ३ मध्ये पाण्याने तळं साचल्या सारखी अवस्था निर्माण झाली असून सरपंच व उपसरपंच यांच्या निवासस्थान असलेल्या भागातच रस्ते व गटारे गाळात गेलेले दिसत आहेत. त्यामुळे या आदर्शतेच्या केवळ गाजरावर भाळलेल्या ग्रामस्थांना आता शितावरून भाताची परीक्षा घेण्याची वेळ आली आहे.

कारखेडा गावाची लोकसंख्या सुमारे ३००० असून हिंदू, मुस्लिम, बौद्ध धर्मीय तसेच सामाजिक आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांचे वास्तव्य मोठ्या प्रमाणावर आहे. ग्रामपंचायतीच्या



पहिल्याच पावसात सरपंच-उपसरपंचाच्या वार्डात साचलं पाणी

तीन वार्डांमध्ये प्रत्येकी तीन सदस्य असून, ग्रामस्थांनी विकासाच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून सत्ताधारी पॅनलला पूर्ण बहुमताने निवडून दिले होते.मात्र, निवडून दिलेले प्रतिनिधी नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे लक्ष देत नसल्याची तक्रार वारंवार ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. रस्ते, गटारे, व पाणी वाहिन्यांची दुरवस्था असून पावसाच्या पाण्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. विशेष म्हणजे वारंवार लेखी मागण्या करूनही सरपंच व उपसरपंचांकडून कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्य करत आहेत. या पार्श्वभूमीवर, पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीचा दिखावा केवळ राजकीय प्रसिद्धी साठीच असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

तालुका स्तरावर व जिल्हास्तरावर आपल्या नावाचा डंका वाजवण्यासाठी काही सत्ताधारी ग्रामपंचायत पदाधिकारी योजना व सुविधांचा बडगा फटकावत असल्याची भावना निर्माण झाली आहे.गावातील वार्ड क्रमांक ३ मधील नागरिकांना पहिल्याच पावसात नाल्याचे पाणी घरात शिरण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यांची खचलेली अवस्था, गटारांची तुंबलेली स्थिती आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ग्रामस्थ संतप्त झाले असून, आता तरी या गावातील पदाधिकाऱ्यांनी केवळ पुरस्कार मिळवण्याऐवजी प्रत्यक्षात पारदर्शक आणि दर्जेदार काम करून दाखवावे अशी ठाम मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणी संबंधित प्रशासनाने तातडीने चौकशी करून आवश्यक उपाय योजना कराव्यात, अशीही मागणी होत आहे. अन्यथा येणाऱ्या काळात ग्रामस्थांचा संयम सुटू शकतो, आणि ग्रामपंचायत विरोधात जन आंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# डॉ. विशाल सोमटकर यांचा शिंदे सेनेला जय महाराष्ट्र

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**वाशीम**- शिवसेना शिंदे गटाचे वाशीम शहर प्रमुख डॉ. विशाल सोमटकर यांनी १७ जून रोजी आपल्या शहरप्रमुखपदासह शिंदे सेनेच्या सक्रीय सदस्याचाही राजीनामा शिवसेनेच्या पक्षनेत्या आमदार भावनाताई गवळी यांचेकडे दिला आहे. डॉ. विशाल सोमटकर यांच्या राजीनाम्याने त्यांच्या समर्थकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.



डॉ. विशाल सोमटकर हे राष्ट्रीय काँग्रेसच्या सेवादलाचे वाशीम जिल्हाध्यक्ष होते. त्यांच्या पक्षात असलेल्या गटबाजीला कंटाळून डॉ. विशाल सोमटकर यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देवून राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांच्या उपास्थितीमध्ये मुंबईला ७ फेब्रुवारी २०२५ रोजी शिंदेसेनेमध्ये प्रवेश घेतला होता.डॉ.विशाल सोमटकर यांचा जिल्हयात असलेला दांडगा जनसंपर्क आणि ते कुशल संघटक असल्याने वाशीम जिल्हयातील हजारापेक्षा जास्त कार्यकर्त्यांनी शिंदे सेनेत प्रवेश घेवून वाशीम जिल्हयात शिंदेसेनेची भरभराट केली होती. पक्ष नेतृत्वाने त्यांच्या कार्याची दखल घेवून डॉ. विशाल सोमटकर यांना १४ एप्रिल २०२५ रोजी वाशीम शहर प्रमुख पदाची जबाबदारी दिली.डॉ. विशाल सोमटकर यांनी पक्षनेतृत्वासह, पक्षनेत्या आमदार भावनाताई गवळी यांच्या आदेशाचे पालन करून शहरामधील जनसामान्यांचे प्रश्न सोडवून सर्व सामान्य जनतेला न्याय देण्यासाठी पुढाकार घेतला. तसेच आगामी वाशीम पालिकेसह जिल्हयातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या होणाऱ्या निवडणुकीत शिंदेसेनेचे बहुसंख्येने सदस्य निवडूण आणण्यासाठी पक्षबांधणीचे कार्य जोमाने सुरु केले होते.डॉ. विशाल सोमटकर यांनी १७ जून २०२५ रोजी पक्षनेत्या आमदार भावनाताई गवळी यांना दिलेल्या राजीनाम्यामध्ये त्यांना पक्ष, संघटनेच्या कामासाठी वेळ नसल्याचे नमूद करुन त्यांनी वैयक्तिक कारणामुळे शिंदेसेनेच्या वाशीमशहरप्रमुख पदासह पक्षाच्या सक्रीय सदस्याचा राजीनामा स्वीकारण्याबाबत विनंती केली आहे.

## दे.राजा शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**बुलडाणा (जिमाका):** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बुलडाणा अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, देऊळगाव राजा येथील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या वसतिगृहात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, दिव्यांग तसेच अनाथ विद्यार्थी यांना आरक्षित प्रवर्गानुसार प्रवेश देण्यात येणार आहे. देऊळगाव राजा येथील नगरपरिषद हद्दीत येणाऱ्या शाळांमधील शालेय व महाविद्यालयीन स्तरावर प्रथम वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी या वसतिगृह प्रवेशासाठी पात्र आहेत. प्रवेश अर्ज https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने भरायचे असून, अर्ज भरल्यानंतर त्याची मुळप्रत वसतिगृहात सादर करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांनी ही संधी मोठ्या संख्येने घेऊन प्रवेश अर्ज भरावेत, असे आवाहन वसतिगृहाचे प्रभारी गृहपाल व्ही. आर. सोनवळ यांनी केले आहे.

# थोडक्यात

## मानव सुरक्षा सेवा ट्रस्टच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**मेहकर (महासागर प्रतिनिधी):** १४ जून रोजी मानव सुरक्षा सेवा ट्रस्ट अंतर्गत मेहकर येथील रुद्र क्लासेस येथे इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा १४ जून रोजी मानव सुरक्षा सेवा ट्रस्ट वतीने सन्मानपत्र व शालेय साहित्य वितरण करून सत्कार सोहळा पार पडला. मानव सुरक्षा सेवा ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष गजानन इंगळे, संस्थापक सचिव गोविंद अग्रवाल तसेच संस्थापक कोषाध्यक्ष संगीताताई साबणकर यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला.

## शिवसेना बांधकाम कामगार सेनेची जिल्हा जम्बो कार्यकारणी गठीत

**खामगाव :** येथील शासकीय विश्राम गृह येथे झालेल्या शिवसेना बांधकाम कामगार सेनेच्या बैठकीमध्ये. शेकडो लोकांनी शिवसेनेत प्रवेश घेतले व बांधकार कामगार सेना विदर्भ प्रदेश प्रमुख मा. सचिन भाऊ विटे. यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उपजिल्हाप्रमुख मा. संजय भाऊ अवताडे . यांच्या प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शनामध्ये बांधकाम कामगार सेनेच्या अनेक पदांच्या नियुक्ती काल करण्यात आल्या. नियुक्ती करण्यात आलेले नवनियुक्त पदाधिकारी बुलढाणा जिल्हा उपप्रमुख - संदिप ठोसर, जिल्हा सचिव- शुभम वावरे, जिल्हा संघटक-शुशिल खोडेक, खामगाव तालुका प्रमुख ज्ञानेश्वर पाटील, उपप्रमुख - सुरेंद्र शरमाळे, सचिव-योगेश पुरोहित, संघटक श्रीकृष्ण कोतवाल, खामगांव शहर प्रमुख प्रविण देशमुख, सचिव - पृथ्वीराज पिंपळेकार, संपर्कप्रमुख मोहम्मद इमरान, प्रसिदधी प्रमुख सलिम खान, शहर निरीक्षक विजय घोडग, शेगाव शहर प्रमुख अरुण श्यामराव नंदाणे, उपाधिती जयेश जामोदे, पंकज अंबारे प्रशांत शेकडो यांच्यासह बांधकाम कामगार सेनेचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी अर्जाची १७ जुलैपर्यंत अंतिम मुदत

**बुलडाणा (जिमाका) :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, बुलडाणा जिल्हा कार्यालयामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमध्ये सरासरी ६०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना गुणांनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड, गुणपत्रिका, बोनाफाईड प्रमाणपत्र, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड, बँक पासबुक इत्यादी आवश्यक कागदपत्रांसह १७ जुलै पर्यंत कार्यालयीन वेळेत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या.,डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,चिखली रोड, बुलडाणा. येथे प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक जे.एम. गाभणे यांनी केले आहे.

## चिखलीतील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**बुलडाणा (जिमाका) :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त शासकीय वसतिगृह, चिखली येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. या वसतिगृहात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग, अनाथ अशा विविध आरक्षित प्रवर्गातील पात्र विद्यार्थिनींना प्रवेश दिला जाणार आहे. नगर परिषद हद्दीतील शाळा, विद्यालये व महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या, प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना अर्ज सादर करता येणार आहे. प्रवेश अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावा लागणार असून, ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंटआउट (हार्ड कॉपी) वसतिगृहात प्रत्यक्ष सादर करणे बंधनकारक आहे.

# सुसंस्कारीत पिढी हीच समाजाची खरी संपत्ती - हभप नितीन महाराज अहिर



**मलकापूर (महासागर प्रतिनिधी):** समाजसुधारनेच्या कार्यात आजवर अनेक थोर संत, महात्म्य, व क्रांतिकारकांनी अतुलनीय योगदान दिलेले आहे.

आजच्या काळात सुसंस्कारित पिढी निर्माण झाली तरच समाज सुदृढ बनेल त्यासाठी प्रत्येक पालकांनी ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. कारण सुसंस्कारित पिढी हीच आज समाजाची खरी संपत्ती असल्याचे प्रतिपादन हभप नितीन महाराज अहिर यांनी आपल्या कीर्तनात केले. येथील महेश भवन येथे विजय गांधी व सौ दुर्गाबाई गांधी यांच्या द्वारा विश्वकल्याण हेतू आयोजित श्रीमद भागवत कथा सप्ताहत १५ जुन रोजी कीर्तनादरम्यान ते बोलत होते.

समाजामध्ये जे व्यसनाचे व स्वैराचाराचे प्रकार वाढलेले आहे आणि त्यामुळे समाज व्यवस्था छिन्न विच्छिन्न झालेली आहे व अराजकता दुःख, नैराश्यग्रस्त झालेले आहे, ही व्यवस्था चांगली व्हावी व समाज निकोपपणे एकत्रित यावा याकरता येणाऱ्या पिढीला संपत्ती ऐवजी संस्काराची शिदोरी देणे महत्त्वाचे आहे.

युवा पिढीला उपदेश करतांना त्यांनी सांगितले की आई-वडिलांच्या सेवेमुळेच भगवंत २८ युगापासून विटेवर उभा आहे. आई-वडिलांची सेवा करून देव मिळवता येतो पण देवाची सेवा करून आई-वडील मिळवता येत नाही. समाजामध्ये एकत्रित कुटुंब पद्धती संस्कार देण्याकरता कारणीभूत असते पण जेव्हापासून व्यक्तिगत स्वतंत्र च्या नावाखाली कुटुंबापासून विभक्त होऊन लोक राहायला लागली तेव्हापासून घरातील जेष्ठ लोकांचे संस्कार हे लहान मुलांना मिळेनासे झाले आहे. म्हणून आई-वडीलांनी मुलांना संस्कारांची शिदोरी दिली पाहिजे असे सांगितले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक माता भगिनी श्रोते उपस्थित होते.

# शालेय पोषण आहारासाठी नवे दर

## पहिली ते पाचवीसाठी ५९ पैसे, तर सहावी ते आठवीसाठी प्रती विद्यार्थी ८८ पैसे वाढ

**खामगाव (का.प्र.) :** शालेय पोषण आहारासाठी प्रतीविद्यार्थी खर्चाची दरवाढ केली आहे.. आहे. त्यानुसार पहिली ते पाचवीसाठी प्रतिविद्यार्थी ६ रुपये ७८ पैसे, तर सहावी ते आठवीसाठी प्रतीविद्यार्थी १० रुपये १७ पैसे दर निश्चित केले आहे. मार्चमध्येही दरवाढ केली होती. त्या तुलनेत आता पहिली ते पाचवीसाठी ५९ पैसे, तर सहावी ते आठवीसाठी प्रती विद्यार्थी ८८ पैसे वाढ झाली आहे.



शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त, तसेच सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार देण्यात येतो. या योजनेंतर्गत केंद्र सरकारकडून पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रती विद्यार्थी १०० ग्रॅम, सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रती विद्यार्थी १५० ग्रॅम तांदूळ पुरवण्यात येतो.

केंद्र शासनाने २७ नोव्हेंबर २०२४ रोजी दिलेल्या निर्देशानुसार मार्चमध्ये प्रती विद्यार्थी खर्चाचे दर वाढवले. त्या वेळी पहिली ते पाचवीसाठी ६ रुपये १९ पैसे, तर सहावी ते आठवीसाठी ९ रुपये २९ पैसे दर निश्चित केला होता. त्यानंतर पुन्हा ४ मार्च २०२५ रोजी केंद्र सरकारने प्रती विद्यार्थी खर्चात दरवाढ करण्यास मंजुरी दिली. त्यानुसार पहिली ते पाचवीसाठी प्रती विद्यार्थी ६ रुपये ७८ पैसे, तर सहावी ते आठवीसाठी प्रती विद्यार्थी १० रुपये १७ पैसे असे दर वाढवले आहेत. नागरी भागात केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीअंतर्गत तयार आहाराचा पुरवठा करणाऱ्या यंत्रणांना पहिली ते पाचवीसाठी ६ रुपये ७८ पैसे, सहावी ते आठवीसाठी १० रुपये १७ पैसे या दराने अनुदान दिले जाणार असल्याचे नमूद केले.

## भोई समाजातर्फे पीडित परिवाराला मदतीची हात



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी):** स्व. संतोष कुरवाडे यांच्या पीडित परिवार श्रीमती वंदनाताई संतोष कुरवाडे वडगाव वान ता. संग्रामपूर यांना १५ जून रोजी १५ हजार रुपये रोख रक्कम आर्थिक मदत संस्थेतर्फे देण्यात आली. संतोष कुरवाडे वडगाव वान यांचे कॅन्सरच्या आजाराने निधन झाले होते .ते घरचे कर्ते पुरुष असल्यामुळे त्यांचे निधनाने कुरवाडे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. परंतु भोई समाज मदत संस्थेच्या माध्यमातून मदत देण्यात आली. यावेळी भोई समाज मदत संस्थेचे समन्वयक, भाजपा सोशल मीडिया शेगाव शहर प्रमुख उमेश सुरेशराव राजगुरे, संजय इंगळे, लक्ष्मण सपकाळ, मनोज वाघमारे, विनोद मेसरे, राजेश श्रीनाथ, प्रकाश भारसाकडे, उमेश राजगुरे, श्रीकृष्ण कुरवाळे, बंडू आमझरे, प्रफुल कुरवाळे , मारोती बोरवार, अंकुश कुरवाळे, प्रशांत कुरवाळे आदींची उपस्थिती होती.

## सोमपुरी महाराज पायी दिंडीचे पंढरपूर वारीसाठी प्रस्थान



**सिंदखेडराजा (महासागर प्रतिनिधी):** तालुक्यातील वर्दडी बु येथील सोनपुरी महाराज यांची पालखी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आज १७ जून रोजी पंढरीकडे रवाना झाली आहे. तत्पूर्वी पालखीची ग्रामप्रदक्षिणा करण्यात आली यावेळी गावातील महिलांनी आपापल्या घरासमोर सडामर्जन करून आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या ग्राम प्रदक्षिणेनंतर पालखी मंदिर परिसरात आल्यावर शेख मुसा शेख अहमद या मुस्लिम परिवाराकडून मागील पंधरा वर्षापासून संपूर्ण पालखी सोहळ्याला फराळ वाटप करण्याची परंपरा आजही कायम आहे. १७ जून २५ रोजी सकाळी पालखीचे प्रस्थान होऊन पालखी आज जालना जिल्ह्यात प्रवेश करून बीड जिल्हा धाराशिव जिल्हा व सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करत तब्बल १८ मुक्काम करून ५ जुलै रोजी सायंकाळी पालखी सोहळा पंढरपूर येथील मीराबाई मठ या ठिकाणी पोहोचणार आहे .

# फसवणूक टाळण्यासाठी अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे घ्या

## जिल्हा अधिक्षक कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन



**खामगाव (का.प्र.) :** बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांनी दक्ष राहून गुणवत्ता व दर्जाची हमी देणाऱ्या अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदीस प्राधान्य द्यावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

बनावट, भेसळयुक्त बियाणे खरेदी टाळण्यासाठी अधिकृत विक्रेत्याकडून बिलासह खरेदी करा. बिलावर बियाण्याचा संपूर्ण तपशील जसे पीक, वाण, संपूर्ण लॉट' नंबर, बियाणे कंपनीचे नाव, किंमत व आपण स्वतः बिलावर सही किंवा अंगठा मारून विक्रेत्याची स्वाक्षरी असल्याबाबतची खात्री करून घ्यावे. खरेदी केलेल्या बियाणेचे वेष्टन, पिशवी टॅग, खरेदीचे बिल व त्यातील थोडे (ओंजळभर) बियाणे पिकाची कापणी होईपर्यंत जपून ठेवावे. खरेदी केलेले बियाणे त्या हंगामासाठी शिफारस केल्याची खात्री करावी. भेसळीची शंका दूर करण्यासाठी बियाणेची पाकिटे, बॅग सिलबंद, मोहोरबंद असल्याची खात्री करावी. बियाणे उगवणीच्या खात्रीसाठी पाकिटावरील अंतिम मुदत पाहून घ्यावी. कमी वजनाच्या निविष्ठा तसेच छापील किंमतीपेक्षा जास्त किंमतीने विक्री अथवा इतर तक्रारीसाठी जवळच्या कृषि विभागाच्या कृषि अधिकारी पं.स., तालुका कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रक निरीक्षक, मोहीम अधिकारी जि.प., कृषि विकास अधिकारी बुलडाणा, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## धनगर समाज महासंघाची जिल्हा बैठक संपन्न



**नांदुरा (महासागर प्रतिनिधी):** येथील धनगर समाज विकास मंडळ नांदुराद्वारा संचलित शिवमल्हार मंगल भवनमध्ये १५ जून रोजी धनगर समाज महासंघाची जिल्हा बैठक उत्साहात पार पडली.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष नानाभाऊ कोकरे तर प्रमूख उपस्थिती माजी प्रदेशाध्यक्ष श्रीराम पुंडे, विदर्भ अध्यक्ष शरद वसतकार, अशोक देवकते, महादेव बोरसे, शत्रुघ्न पाचपोर, पंकज भिवटे, रविंद्र गुरव प्रकाश जुमले यांची प्रमूख उपस्थिती होती. सर्वप्रथम राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. यानंतर शरद वसतकार, श्रीराम पुंडे, नानाभाऊ कोकरे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती माजी उपसभापती पुंडलिक भिवटे, शेगाव खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष अनंता बोरसे, गजानन गुरव, मार्तंडराव बोरसे, निलेश घोंगे, शिवाजी गुरव, गजानन नागे, उत्तम बोरसे, चंद्रभान कळंबे, अशोक साबे, रघुनाथ सुशिर, दिलीप भिवटे, विलास चीत्रे, विजय वसतकार आदींसह समाज बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## शेगाव न.प. आणखी एका अग्निशमन गाडीची भर




**शेगाव (महासागर प्रतिनिधी):** नगरपालिकेच्या अग्निशामक दलामध्ये आणखी एका गाडीची भर जिल्हा नियोजन समिती बुलढाणा यांचे मार्फत शेगाव नगरपालिकेला नवीन अग्निशामक गाडी पाठविण्यात आली. सदर गाडी आज सकाळी शेगाव नगरपालिकेच्या प्रांगणात उभी असताना पत्रकार विजय मिश्रा यांनी अग्निशामक दलाच्या गाडीची चावी मुख्य अधिकारी जयश्री काटकर बोराडे यांना प्रदान केली.

जिल्हा नियोजन समितीकडून वर्ष २०२४- २५ करिता जिल्ह्यातील नगरपालिकांना अग्निशामक गाडी देण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार तसे प्रस्ताव पाठविण्यात आले होते यामध्ये शेगाव नगरपालिकेचा प्रस्ताव हा सर्वात शेवटी पाठविल्यानंतरही सर्वात आधी शेगाव नगरपालिकेला आज सकाळी अग्निशामक गाडी पाठविण्यात आली सदर गाडीची किंमत ६५ लाख रुपये असून यामध्ये अजूनही बऱ्याच प्रकारच्या सेवा देण्या देण्याकरिता नियोजन करण्यात आलेले आहे.

शेगाव नगरपालिकेच्या अग्निशामक दलामध्ये आता चार गाड्या झाल्या आहेत ज्या जिल्ह्यामध्ये कोणतेही नगरपालिकेजवळ नाही अशी माहिती अग्निशामक दलाचे नागेश रोठे यांनी दिली

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधिश क.स्तर कोर्ट नं. १ नांदुरा**

एम.जे.सी. नं. १०५/२०२५
चौ.ता. २३/०७/२०२५
अर्जदार करीता अधिवक्ता-
ॲड.एस.पी.जैन

अर्जदार-१. श्रीमती प्रमिलाबाई शिवनारायण जैस्वाल २. संतोष शिवनारायण जैस्वाल, ३. शैलेंद्र शिवनारायण जैस्वाल ४. बन्सीलाल शिवनारायण जैस्वाल ५. पवन शिवनारायण जैस्वाल सर्व रा. चांदुरबिस्वा ता. नांदुरा जि. बुलडाणा

...विरुध्द. कोणी नाही

या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार क. २ ते ५ हयांचे वडील शिवनारायण ब्रिजलाल जैस्वाल हे चांदुरबिस्वा येथील रहिवाशी होते व ते चांदुरबिस्वा येथेच दि. २२.११.२०२२ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार हयांनी मयत शिवनारायण ब्रिजलाल जैस्वाल हयांना त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार हेच वर्ग १ नुसार कायदेशिर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी हया न्यायालयात अर्ज केला आहे व त्या अर्जाची सुनावणी तारीख २३/०७/२०२५ रोजी १०-३० वाजता होईल. तरी या जाहीर नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, सदर प्रकरणी ज्यांना काही हरकती, आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी वरील तारखेस किंवा सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासुन ३० दिवसाचे आत वि. न्यायालयात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहुन त्यांचे आक्षेप, हरकती सादर करावे. अन्यथा कोणाचीही काहीही आक्षेप, हरकत नाही असे समजुन अर्जदार हयांना वारस हक्क प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दि.२०/३/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दिनांक : २०/३/२०२५

शिक्का

आदेशावरुन
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
नांदुरा, जि.बुलडाणा

# शेतात पडलेल्या जिवंत तारेला स्पर्श झाल्यामुळे बैलाचा शॉक लागून जागीच मृत्यू



**सिंदखेडराजा (महासागर प्रतिनिधी) :** सध्या खरीप हंगाम सुरू आहे शेतकरी शेतामध्ये पेरणी करताना मग्न आहे , कुणी ट्रॅक्टर ने पेरणी करताना दिसत आहे तर कोणी बैलाने पेरणी करताना दिसत आहे ' मात्र खरीप हंगामामध्ये एखाद्या शेतकऱ्याचा बैल मृत्यूमुखी पडला तर याचं दुःख शेतकऱ्यांना अतिशय वेदनादायक असतं '

अशीच एक दुर्दैवी घटना १६ जून रोजी सिंदखेडराजा तालुक्यातील सोनोशी बोरखेडी खुर्द शिवारामध्ये घडली रंगनाथ साहेबराव वाघमारे हे शेतकरी असून खरीप हंगाम सुरू असल्यामुळे ते बैलांना घेऊन शेतामध्येच होते 'बैलांना चारण्याकरता सोडले असता शेतामध्ये अवकाळी वादळामुळे विद्युत जिवंत तार खाली जमिनीवर पडलेली होती , खाली पडलेल्या जिवंत तारेला बैलाचा स्पर्श झाला व बैलाला शॉक लागून बैलाचा जागीच मृत्यू झाला ' महावितरण च्या गलथान कारवारामुळे ऐन खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांच्या बैलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ज्या बैलांच्या भरोशावर शेती कसायची होती आज तोच बैल मृत्यु मुखी पडल्याचे पाहून शेतकरी रंगनाथ वाघमारे हे उद्दीग्र झाले .

त्यामुळे बैलाची अंदाजी किंमत ४०,००० असून शासनाने त्वरित शेतकऱ्याला नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे '

नियमित वाचा- दै.महासागर

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

